सं. ठाणें

# आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी

नामदेव लक्ष्मण ढसाळ



REFBK-0021740
REFBK-0021740

वि. कृ. अनुक्रम
२३०९

संदर्भ
अ५१५६
निबंध
का०५
२३०९

# आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी

नामदेव लक्ष्मण ढसाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २९६८०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
का०५
२३०९
REFBK-0021740
REFBK-0021740

दलित पँथर प्रकाशन

© नामदेव ढसाळ

प्रथम आवृत्ती :
२५ ऑगस्ट १९७६

**मूल्य पाच रुपये**

प्रकाशक
लतिफ खाटीक
जयदेव गायकवाड

---

२५/३८६ आझाद नगर
अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८

मुद्रक
प्र० पु० भागवत

---

मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४०० ००४

**पँथर शहीद भागवत जाधव यास**

*तुझ्या मरणातलं हौतात्म्य मी मनोमन जाणलं. त्याचं भांडवल करण्याचं चुकूनही माझ्या मनाला कधी शिवू नये...*

## दलित साहित्याच्या इतिहासातील एक अपरिहार्य कविता

नामदेव ढसाळ नावाचा मराठीतील दलित वाङ्मयाच्या चळवळीतील आघाडी-वरचा खंदा कवी व लेखक आज आपली एक प्रदीर्घ कविता घेऊन एक वर्षाच्या काव्यलेखनसंन्यासानंतर सामान्य वाचकांसमोर व दर्दी रसिकांसमोर येत आहे. ही कविता या दलित कवीने काळाला समक्ष ठेवून व इतिहासाला प्रत्यक्ष साक्ष ठेवून लिहिली आहे. खऱ्या वर्तमानकालीन संदर्भात म्हणायचे तर ती समयसापेक्ष व इतिहाससमक्ष अशी उत्स्फूर्त व बांधील कविता आहे. कुणी एक मराठी काव्यक्षेत्रातील आधुनिक वाल्मीकी कधीतरी, कुठेतरी शिष्टजनांसमोर आपले परंपरागत शब्दांचे इमान राखीत म्हणून गेला होता की, 'आजची मराठी कविता रसाळ नामदेवापासून ढसाळ नामदेवापर्यंत आली आहे'. त्या महाकवीच्या या उद्गारात काहीशी एक तुच्छ लघु मनोवृत्ती प्रकट झाली होती असा भास पुष्कळांना झाला. कुणी म्हणालेसुद्धा की, या आधुनिक वाल्मीकीला धड रसाळ नामदेवही कळला नाही की ढसाळ नामदेवाचेही आकलन त्याला झाले नाही. रसाळ नामदेवाप्रमाणेच ढसाळ नामदेवही भक्त पुंडलिकाने ठेवलेल्या विटेवरील करकटावर हात ठेवून युगे युगे उभ्या असलेल्या परमेश्वरी अवतारा-बरोबर भांडण मांडतो व त्या भांडणात तो चक्क त्या परमेश्वराला शिवी हासडतो. त्याला नाकारतो. दलितांची, पीडितांची, शोषितांची युगायुगांची फसवणूक करीत निष्क्रियपणे हात आखडते ठेवून तटस्थ उभ्या असलेल्या या परंपरापुष्ट परमे-

श्वराची तो नग्न निर्भर्त्सना करतो. आणि ती त्याने का करू नये ? ती तशी निर्भर्त्सना करण्याचा हक्क प्राचीन ‘ नामदेव रसाळा ’इतकाच आधुनिक ‘ नामदेव ढसाळा ’ला-सुद्धा क्रमप्राप्त झाला आहे. आणि आधुनिक नामदेव ढसाळाचे दुःख, त्याची वेदना, त्याचे व त्याच्या पतित, शूद्र, अस्पृश्य व दलित गणल्या गेलेल्या समाजाचे पीडन, युगायुगाच्या रूढिग्रस्त व धर्मआंधळ्या सामाजिक वाटचालीबरोबर विसाव्या शतकात शतगुणित व सहस्रगुणित होत अती दारुण व अती तीव्र झाले आहे. ढसाळ नामदेवाची व त्याच्यासारख्या समग्र दलित कवींची, लेखकांची, विचारवंतांची व बंडखोरांची ही पीडा आपल्या शासनाधिष्ठित व शिष्टजनसुरक्षित हस्तिदंती मनोऱ्यात स्वार्थी पौराणिक प्रतीके कोरीत बसलेल्या आधुनिक वाल्मी-कींना, व्यासांना व कालिदासांना कळावीत तरी कशी ? आणि त्यांना ती चुकून कळलीच तर त्यांनी ती नकळत्यावर न घालून चालावयाचे तरी कसे ?

स्वयंभू, अभिजात, सशक्त व समर्थ कवीसमोर प्राचीन काळापासून दोनच पर्याय समोरासमोर उभे ठाकलेले आहेत. त्यांतील एक पर्याय म्हणजे कवीने उबडउबड शासनव्यवस्थेला शरण जाणे. तिची मनधरणी करणे. तिची खुशामत करणे. आणि दुसरा पर्याय म्हणजे शासनव्यवस्थेला शरण जाण्यापासून स्वतःला परावृत्त करणे. लाचार न होणे. भीक न मागणे. मनधरणी न करणे. खुशामत टाळणे. किंबहुना शासनव्यवस्थेच्या तोंडावर चार फटकळ शब्द अशा रीतीने फेकणे की, गडगंज वैभवाचे हत्यारबंद सामर्थ्य मिरविणारी ही शासनव्यवस्था केवळ त्या चार शब्दांनी तिरीमिरी आल्यासारखी झेलपटली जावी. डळमळावी. पंगू आणि असहाय व्हावी. अंतर्मुख व सुन्न व्हावी. अभिजात कवीच्या या स्वयंप्रतिष्ठेचे व सामर्थ्याचे भान, ‘प्रियदर्शिनी ’ला संबोधून आपली ‘उद्देशिका’ (ode) लिहिणाऱ्या या ढसाळ नाम्याला पुरेपूर आहे. तो आपल्या सरळ बालबोध भाषेत धड्ड लिहून जातो :

एक कवी २९ पंतप्रधानांच्या इतकी
कुवत ठेवू शकतो
परंतु त्यातील पॉझेटिव्ह-निगेटिव्ह
अ‍ॅप्रोच तपासला पाहिजे
आणि या सर्वांमधून स्रवत राहणारं
जनतेशी असलेलं प्रतिबद्ध नातं
आम माणसाच्या भल्याची तळी उचलणारे कवी

असतात बुद्धिबळातल्या प्यादीसारखे
ते सरळ शत्रूंचा मार्ग रोखतात
अंगावर घाव झेलतात
आणि इभ्रतीला कॅसलिंगपासून वाचवतात

कवीला इतिहासाचे संपूर्ण भान आहे. किंबहुना इतिहासाचे भान त्याला आहे म्हणूनच त्याचे स्वतःचे सभोवतालच्या समग्र वास्तवतेचे भान अव्यभिचारीपणाने ठाम शाबूत आहे. प्रियदर्शिनी हे आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र आहे ही त्याची जाणीव जितकी आत्मनिष्ठ आहे तितकीच ती वस्तुनिष्ठ आहे. कारण कवीला इतिहासाचे विज्ञाननिष्ठ भौतिकतावादी ज्ञान प्रगल्भतेने झाले आहे. विरोधात्मक भौतिक संघर्षातून वस्तुनिष्ठपणे इतिहासाची पावले मानवी विकासाच्या अंतिम दिशेने कशी पडत असतात याचे अंतर्ज्ञान व बहिर्ज्ञान या कवीला बव्हंशाने होत आहे व झाले आहे. कवी आपल्या देशाच्या इतिहासाच्या एका आणीबाणीच्या टप्प्यावर उभा आहे. या टप्प्यावर, चव्हाठ्यावर उभ्या राहिलेल्या व्यासमहर्षीसारखा उभा राहून, तो आपले नेत्र चौफेर विस्फारतो आहे व दोन्ही बाहू वर उभारून कालपुरुषाला जणू आवाहन करतो आहे. प्रियदर्शनीला समयसमक्षतेचे प्रतीक बनवून जणू तो कालपुरुषाशीच संवाद करीत उभा ठाकला आहे. आणि हा काळपुरुष दुसरातिसरा कुणी नसून प्रत्यक्ष मूर्तिमंत असा माणसाला केंद्रीभूत ठेवून माणसांकडूनच माणसांसाठी घडविला जाणारा इतिहास आहे. या इतिहासाच्या विराट जाणिवेने कवी आतूनबाहेरून पेटलेला आहे. इतिहासाला पाठ दाखवीत षंढ कलावादाच्या नावाने आपल्या सौंदर्यवादी शब्दसोनेरी मनोऱ्याच्या बिळात जाऊन दडी मारून बसणे कवीला नामंजूर आहे. इतिहासाला सामोरा जायला तो सरळ सरळ निर्भयपणे, पण ठाम बांधिलकीने तयार झालेला आहे आणि इतिहास म्हणजे काही गुळगुळीत, रसाळ व मुलायम शब्दपुष्पांची कवीला डोळे मिटून सुखेनैव पहुडण्यासाठी काळाने पसरून ठेवलेली शृंगारशैय्या नाही, याची प्रखर व डोळस जाण संवेदनाक्षमतेने या कवीला आलेली आहे. ऐतिहासिक वास्तववादाशी व भौतिकतेशी विज्ञाननिष्ठ सहसंवेदनेने, मानवतानिष्ठ स्पंदनक्षमतेने व सर्जनशील सक्रियतेने आजचा पुरोगामी व दलित साहित्यातील कवी, लेखक, विचारवंत आपोआपच बांधला जातो. या ऐतिहासिक वास्तवाचा आविष्कार हा त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा एक अपरिहार्य स्थायीभाव होऊन राहिलेला असतो.

म्हणून नामदेव ढसाळ या दलित व पुरोगामी कवीची ही 'उद्देशिका' पुरोगामी व दलित साहित्यातील, इतिहासातील प्रियदर्शिनीइतकेच एक अपरिहार्य पान होऊन राहणार आहे. या साहित्याच्या इतिहासाला उजाळा देणारी अशी ती एक प्रक्षुब्ध व दीप्तिमान घटना ठरणार आहे. 'साला प्रोपेगॅंडिस्ट निकला' म्हणून आरडाओरडा करीत तथाकथित आकृतिबंधवाले आपल्या शुभ्र सदऱ्यावर कसे शिंतोडे उडविणार आहेत चिखलाचे, हे कवी ओळखून आहे आणि तरीही आपले तळगाळाच्या जळजळीत अनुभूतींचे व मानवानेच मानवाशी साधावयाच्या प्रतिबद्धतेचे इमान किंचितही ढळू न देता हा कवी ही दीर्घ अपरिहार्य कविता लिहायला उद्युक्त झाला आहे. म्हणूनच ही कविता केवळ एकाच पाकळीचे अद्भुत व रोमॅण्टिक फूल होऊन राहत नाही. त्या फुलाला त्याच्या आविष्काराच्या गतीतून व लयीतून पाकळ्यांमागून पाकळ्या फुटत जातात व एका समग्र आविष्काराचे प्रतीक बनून ही कविता म्हणजे अनेक पाकळ्यांचे बहुरंगी व बहुपदरी जाडजूड आणि तरीही गंधतरल असे भुईफूल बनून राहते. या फुलाच्या आतही आणखी विविध अर्थांची फुले फुलतच असतात. द्रष्ट्या गुलाबाचे फूल हे त्यांपैकीच एक. हे कवीच्या शब्दांतून साकार झालेले व भारताच्या या मातीतच उगवलेले भुईफूल जशी एक निर्भेळ कविता आहे, तशीच ती एक इतिहासधारा आहे. तिला इतिहासाचा आधार आहे तशीच इतिहासाची धार पण आहे. या कवितेने काव्यमय आविष्काराचा एक प्रदीर्घ पल्ला गाठला आहे. आशयाची एक उत्तुंग झेप घेतली आहे. रणढोलाचा निरंतर निनाद घुमविणारी अभिव्यक्तीची अखंड लय साधली आहे.

प्रियदर्शिनीला उद्देशून कवी तिच्याशी काहीसा एकतर्फी संवाद करतोय. या कवितेचा प्रकार मराठीत फारसा न लिहिला गेलेला व आंग्ल वाङ्मयात मातबर प्रतिभावान कवींनी अमर करून ठेवलेला 'उद्देशिका' 'Ode' या काव्यप्रकारातच मोडतो. 'उद्देशिके'चा एक प्रमुख मध्यवर्ती उद्देश असतो व तिची आणखी काही आनुषंगिक वैशिष्ट्ये असतात. ही 'उद्देशिका' भूतकाळातील वस्तूला किंवा व्यक्तीला उद्देशून जशी लिहिता येते तशीच ती वर्तमानकालीन वास्तूला व व्यक्तीला-देखील उद्देशून लिहिता येते. आपण एक 'उद्देशिका' लिहितोय या कुठल्या तांत्रिक जाणिवेने कवी ढसाळ यांनी ही कविता लिहिलेली नसावी. परंतु आपो-आपच तिला एका सर्जनगर्भ व द्रष्ट्या उद्देशिकेचे कधी हळुवार, कधी रुद्रगंभीर, कधी प्रक्षोभक तर कधी आत्मचेतनेने पेटून उठलेल्या व पीडनातून व वेदनेतून उग्र कठोर झालेल्या विद्रोहाचे व नकारभावांचे काव्यरूप मुलायमपणे प्राप्त झाले आहे.

ही 'उद्देशिका' तसे म्हटले तर एक टाहो आहे. एका युगाची दाही दिशांचा भेद करणारी आरोळी आहे. तर 'प्रियदर्शनी'ला तिच्या भूतकाळाची जाणीव करून देत तिच्यासमोर अक्राळविक्राळपणे ठाकलेल्या वर्तमानकाळाचा इशारा देणारी ही युगगर्जनाही आहे. गेले वर्षभर जे अनामिक गंडाने पछाडले गेलेले आहेत व ज्यांच्या शब्दांना पिसाळलेले कुत्रे डसले आहे, जे समीप येणाऱ्या भल्या वस्तूंचा चावा घेत सुटले आहेत व परदुःखाची शीतल गाणी स्वतःचे स्थिरजंगम सांभाळून गाताहेत, जे अराजकाचा सर्ग लिहीत बसलेयत व छिनालपणाचा हैदोस घालताहेत, ज्यांना इथल्या सार्वभौम पाण्यात हिरोशिमा, नागासाकी घडवून आणून विष पेरायचे आहे, त्यांच्या वासनाकांडी कारवायांचे वर्णन कवी शब्दांचे अंगार पेटवीत व फुंकर मारून ते शब्द-अंगार पुनः पुनः फुलवीत, तळवर्गाच्या अंगभूत क्रुद्धतेने व त्वेषाने साकार करतो. कवी प्रियदर्शिनीला उद्देशून म्हणतो :

प्रियदर्शिनी—
ही एका छोट्या गृहयुद्धाचीच
चाचणी आहे
तू राहिली आहेस
पोलादी पावलावर उभी...

ही प्रियदर्शिनी कुणी एक पुरुषांना केवळमात्र नेत्रसुख देणारी हळुवार भोगप्रवण अबला नाहीय. तिच्या हातात ज्ञान आहे, बळ आहे, हत्यार आहे, आणि जनतेच्या शत्रूंबरोबर तिने युद्ध पुकारले आहे. 'युद्ध आणि मरण' यातील आपल्याच जन्मभूमीतील 'रिदम्' ऐकत असतानाच कवी प्रियदर्शिनीला त्याच्या हृदयात पडघमसारखे उमटत राहणारे 'तिसऱ्या जगाचे पडसाद'ही एका विश्वलयीत, सुरात व मुक्त छंदात आवर्जून ऐकवितो. आणि आम्हीही या लढाईतून दूर कसे राहू शकतो, असा सवाल कवी प्रियदर्शिनीला टाकतो. कारण कवीची वर्गलढ्याची जाणीव जिवंत व प्रखर आहे. कामगारवर्ग, आदिवासी, 'गावकुसाबाहेर प्रज्वलित झालेली ठिणगी', शेतमजूर रणांगणात उतरतात तेव्हाच ही लढाई जिंकली जाते हे सत्य कवीला ज्ञात आहे. कवी प्रियदर्शिनीला तिच्या बाळपणाची आठवण करून देतो. तिचे बालपण म्हणजे एका प्रचंड इतिहासवृक्षाखाली वाढणारे दुसरे एक कोवळे, पुरोगामी, क्रांतिक्षम व अपरिहार्य असे इतिहासाचे रोपटे. आता ते रोपटे वाढले आहे. वेलीचा वटवृक्ष झाला आहे. त्या वटवृक्षाला इतिहासाने साद घातली आहे आणि इतिहासाला त्या वृक्षाकडून

'ओ' मिळालेली आहे. पण प्रियदर्शिनीचे हे वर्णन म्हणजे तिची खोटी, भाबडी वा आपमतलबी खुशामत नाहीय : कवी परखडपणे व टिच्चून सांगतो :

मी तुझं चरित्र रंगवायला इथं बसलो नाही
किंवा स्तुतीगायची तुझी सुपारीही घेतली नाही
खरंच प्रियदर्शिनी
व्यक्तींवर कविता लिहायला मला आवडत नाही
तस्संच कवितेचा विषय झालेल्या व्यक्तीलाही
कवितेपासून अस्पृश्य ठेवणंही मला आवडत नाही.

तिच्या राजकीय कृत्यातून नगरजनांचा विजय जर प्रतीत होत असेल, ग्राम्य माणूस वेठबिगारीतून मुक्त होताना दिसत असेल, कामगारवर्गाला आघाडी व दलितांना प्रतिसाद मिळत असेल, तर मी तटस्थ कसा राहू, हा कवीचा प्रियदर्शिनीला पुनःपुनः विचारला गेलेला सवाल आहे. आपली कविता blinded action करीत नाही हे कवी ठासून सांगतो; कारण आंधळी कृती हा फॅसिझमचा उगम असतो हे आपल्या शब्दासकट फॅसिझमला विरोध करीत कवी चांगले जाणतो. तिची भूमिका कवीला मान्य आहे म्हणूनच तिलाही आपली भूमिका स्पष्ट करून सांगण्यासाठी कवी अंतःप्रेरणेने प्रवृत्त झाला आहे.

तुझ्या युद्धाचा होम पवित्र आहे
सारी जनता ते रणकुंड धगधगत ठेवील
प्रियदर्शिनी तू होऊन बसली आहेस
आमच्या इतिहासातले एक अपरिहार्य पात्र

अशीच या कवीची त्याच्या प्रियदर्शिनीबद्दलची वैचारिक व प्रामाणिक धारणा आहे. द्वंद्वात्मक भौतिकतेचे गतिमान नियम चपखलपणे उलगडून दाखवीत, प्रियदर्शिनीला, कवी ठसवून व पटवून सांगतो,

प्रियदर्शिनी—
तुला लिहायचंय इतिहासातील एक अपरिहार्य प्रकरण

कारण

माण्सामाण्साने घडली जाते जनता
आणि जनतेचा जन्म विकास पावतो
वस्तुनिष्ठ नियमांच्या वादळामधून

विसाव्या शतकाच्या या उत्तरार्धात एकीकडे दुनियेचा तोल ढासळतोय, दुसरीकडे सावरतोय व आपण सर्वच एका अवघड जागी, जिथून माघार घेता येणार नाही, अशा Point of no ruturn ला येऊन थांबलो आहोत, हे विदारक वास्तवही इतिहासाला साथ ठेवून कवी प्रियदर्शिनीच्या नजरेला आणून भिडवतो. तोच हा कवी भुकेल्या पोटी दगडी लेण्यामधला बुद्ध अनुभवतो. बुद्धाचा चेहरा घेऊन आकाशीच्या बाप्पाकडे का गेला नाहीस असा वेदनांकित येशूला प्रश्न विचारतो आणि मग प्रेषितांना साक्ष ठेवून तो अमर आणि अजय असे माणसाचे आशावादी सूक्त गातो. माणसाची माणसासाठीच माणसाकडून कवी बनून ऋचा रचतो. कारण कवीची स्वतःवर व स्वतःच्या कवितेवर अपार श्रद्धा आहे. कवितेचे ऐतिहासिक कार्य त्या सम्यक प्रज्ञेने कवी पुरेपूर जाणतो. तो म्हणतो :

प्रकाश आणि स्वातंत्र्य ही आहे जगाची शक्ती
आणि कविता आहे जगाचे हृदय
ती जाणिवेला सखोलता देते
ती भावनेला व्यापकता देते
ती रक्तातून उमललेल्या संवेदना-फुलांवर मोहित होते
ती पूर्वजांच्या चुकांचा कर्तृत्वाचा वैगुण्याचा
ऱ्हासाचा विजयाचा छळाचा इतिहास अधोरेखित करते

दलितांची भूक, त्यांचे दारिद्र्य, त्यांचें दैन्य, त्यांचे दास्य आणि त्यांचा छळ, या सर्वांचे वळ कवीच्या पाठी, पोटी, हृदयात व मेंदूत ठसठसून उठलेले आहेत. म्हणूनच दलितांच्या जीवनाची प्रियदर्शिनीसाठी या 'उद्देशिके'त कवीने रचलेली गाथा महाकाव्याची पृथगात्मता, आर्तता व अर्थपूर्णता घेऊन प्रभावी स्वभावोक्तीने अभिव्यक्त होत राहते. पांढऱ्या संस्कृतीच्या काळ्या कृत्यांची जाणीव आपसूकच कवीचे नाते 'हार्लेम' आणि 'घेटो'शी जोडते. या नात्याने एकजीव होऊन कवी गातो :

ज्या संस्कृतीत अस्पृश्य असणं हे होतं विलक्षण पाप
त्याबद्दल किती लिहू
हार्लेम आणि घेटोबद्दल
महारवाडा नि मांगवाड्याबद्दल
वरळीत पेटलेल्या ठिणगीचा ज्यांनी

खून पाडला
ज्यांनी शहीद भागवत जाधवच्या
कधी न झुकणाऱ्या शिरावर धोंडा घातला
ज्यांनी नारनवरेला दगडांसाठी कापला
ज्यांनी गवईबंधूंची तेजस्वी बुबुळे फोडली
किलावेनमानी नि हाथीगड
जोहान्सबर्ग नी कॅलिफोर्निया
ज्यांनी निग्रोंच्या लाल रक्ताने आपले गोरे पापी
पंजे रंगवले...

कवीची ही तडफड, उरस्फोड, आकांत, जखम, घाव, रक्त, पू वाहतच राहतो. म्हणूनच आमच्या इतिहासातील एक 'फेज' (phase) होऊन राहिलेल्या प्रियदर्शनाला कवी युगांताचा पाठ देत आवाहन करतो :

आत्ता तू करायला हवायस
भूतवर्तमानभविष्य ह्या त्रिकाळाचा
स्थूल नि सूक्ष्म विचार
ज्ञानाचा उद्‌भव ज्या श्रमातून होतो
त्या श्रमसाफल्याच्या उद्दिष्टांना तू द्यायला
हवंयस निमंत्रण...

आमचे बहुवांछी स्वातंत्र्य आमच्यापर्यंत येण्यासाठी पडेल तो त्याग करायला आपल्या कच्च्याबच्च्यांसकट कवी तयार झाला आहे; कारण प्रियदर्शिनीचे अंतः-करणसुद्धा अंतर्‌स्पंदनांनी स्फुरणारं संवेदनाक्षम चैतन्यकेंद्र आहे अशी कवीची सहानुभूत अशी सूक्ष्म व तीव्र धारणा आहे. कवीने तिला पाहिलीय. 'जाझच्या लयीत प्राणांतिक होऊन पॉल रॉबसनने छेडलेलं मुक्तीचं गीत' ऐकताना शहार-लेली, 'मानवतेचा नि लोकशाहीचा ठेका' घेणाऱ्यांनीच पॉलची केलेली मुस्कटदाबी पाहून 'तुझ्या रक्तात पसरलेली संतापाची लाट' जी 'इतिहासाने न्याहाळली' तिची नोंद कवीच्या हृदयातसुद्धा झाली आहे. सोनारबंगल्याच्या हृदयात हिंसेचा चाकू हाणला गेला तेव्हा 'तुझं आक्रंदन इतिहासानं अनुभवलं आहे' याची ग्वाही कवी प्रियदर्शिनीला देतो. याच प्रियदर्शिनीने खुद्द न्यूयॉर्क शहरामध्ये निक्सनची मेजवानी नाकारली होती. अंकल होच्या कविता वाचून भारावणारी, पाब्लो नेरुदाच्या मरणाने भडकून उठणारी, नव्या जगाच्या पितृभूमीला अभिवादन

करणारी, आफ्रो आशियाच्या नि तिसऱ्या जगाच्या भल्यासाठी 'समझोता एक्सप्रेस' सुरू करणारी, नव्या चीनशी संबंध जोडायला निघालेली (घावाच्या जखमा भरल्या-नंतर), अशा या प्रियदर्शिनीला कवी थय थय नाचत येणाऱ्या आणि दुष्ट सिंहासने पालथी घालणाऱ्या चंडिकेच्या व महारुद्राच्या स्वरूपात पाहण्याची उत्कट इच्छा प्रगट करतो. तो तिच्या या उग्ररौद्र स्वरूपाला पुढील शब्दांत आलवतो व तिच्याकडे मागणे मागतो :

तू स्वातंत्र्याला अभय दे
तू मुक्तीला अभय दे
तू नव्या जगाचा झेंडा लहरत ठेव

कारण इतिहास-वास्तवाची दारुण शोकांतिकाही कवी नजरेआड करू शकत नाही. एकच वाकडे पाऊल आणि इतिहास कोणत्या भलत्या थराला जाऊन पोचतो याची प्रचीती कवीने युगायुगांतून घेतली आहे. तो म्हणूनच तिला 'जागृत' रहाण्याचा सल्ला देतो. असा सल्ला देणे, जो अभिजात व बांधील कवीचा अधिकारच आहे, तो कवी पुढील शब्दांत निक्षून बजावतो. तो म्हणतो :

प्रियदर्शिनी तू जागृत रहा
रात्र वैऱ्याची आहे.
जर सैल सोडलास लगाम
नि वाकडं पडलं चुकून तुझं पाऊल
तर माणसांचे दुष्मन येतील सत्तेवर
आणि तुझ्या अगोदर
फासावर चढवतील जनतेच्या
कवींना—
त्या दिवशी इतिहास तुला क्षमा करणार नाही
त्या दुर्दैवी दिवसाला तू देऊ नकोस
संधी

नामदेव ढसाळांची ही दीर्घ 'उद्देशिका'ही या कवितेच्या 'अपरिहार्य पात्रा'-इतकीच विद्यमान मराठी साहित्यसृष्टीतील एक अपरिहार्य कविता आहे. या कवितेचे वाङ्मयीन समीक्षण करण्याचे या क्षणाला प्रयोजन उरलेले नाही. एका अलिखित महाकाव्याचा महाकवीच्या द्रष्टेपणाने ढसाळ नावाच्या नामदेवाकडून

लिखित झालेला हा प्रतिभासंपन्न व इतिहासगर्भ असा महासर्ग आहे. या ढसाळ नामदेवानेच 'गोलपीठा' लिहून मराठी भाषेला परंपरागत विशिष्ट शाब्दिक संकेतांतून व शिष्टकवींच्या शाब्दिक गुलामगिरीतून मुक्त केले आहे. मातीतच जन्मलेले आणि मातीतच ठिबकणारे दलित माणसांचे रक्त, अश्रू, श्रम, घाम, घाण आणि विटंबना यांची खरीखुरी भाषा प्रथमच त्याने मराठी कवितेला दिली. "पाब्लो नेरूदा, मायकोव्हस्की, गॅब्रियल सेलाया, वुइल्यम एडवर्ड, बर्गाहर्ड ड्युब्रॉइ यांच्या कवितेशी व वाणीशी 'नाम्या'च्या कवितेची तुलना करण्याचा मोह मी या क्षणाला आवरून घेत आहे. मात्र रशियन कवी मायकोव्हस्कीने क्रांतिपूर्व व क्रांतिउत्तर नव्या रशियन कवींना केलेला उपदेश इथे मला मांडावासा वाटतो : How are verses to be made ? (काव्य कसे लिहिले जावे ?) या आपल्या आत्मकथनपर प्रदीर्घ लेखात मायकोव्हस्की म्हणतो : Give the new language full right of citizenship at once; the shout instead of the lilt, the thunder of the drum instead of a lullaby :

Keep in step with the revolution!
On the march, about turn!

'नव्या भाषेला नागरिकत्वाचे संपूर्ण हक्क लगेच देऊन टाका. गुलगुलु गीतांच्याऐवजी गर्जना; हळुवार अंगाईगीतांऐवजी रणढोलाचा ढणढणाट येऊ द्या.'

क्रांतीच्या पावलाबरोबर पाऊल टाका !

केशवसुतांच्या घोषवाक्यात सांगावयाचे तर

खांद्यास चला खांदा भिडवून.

कारण क्रांतिगामी मानवतेचे प्रतिक्रांतिकारक शत्रू दाट अरण्यात दडून राहिलेल्य हिंस्र श्वापदांप्रमाणे दडी व बुडी मारून राहिलेले आहेत. हे छुपे मानवतेचे शत्रू आपले छुपे साम्राज्यवादी डाव छुपेपणाने जगभर, अंतःकरणात नामोहरम न होता पुनः नव्याने टाकू लागले आहेत. प्रियदर्शिनीला इतिहासाचे पाठ तिच्या अकराव्या वर्षापासून देताना तिच्या द्रष्ट्या पित्याने वसाहतवाद नष्ट झाल्यावरही उरणाऱ्या 'अदृश्य साम्राज्या'ची व 'साम्राज्यवादा'ची समज, शिक्षकाच्या भूमिकेतून नीट व स्पष्ट दिली होती. आज या घटकेला प्रियदर्शिनी केवळ इतिहासाची शाळकरी अभ्यासू मुलगी उरलेली नाही. आपल्या पित्याकडूनच मोठ्या

हिंमतीने, आत्मविश्वासाने व युगधारणेने इतिहासाचा वारसा तिने निर्भयपणे स्वीकारला आहे. काळाने मोठ्या कौशल्याने तिला आमच्या देशाच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र ठरविले आहे. या अपरिहार्य पात्राला आपली भूमिका इतिहासाच्या रंगभूमीवर यथायोग्यपणे उठविणे ही गोष्टसुद्धा आज अपरिहार्य झाली आहे. एक डोळस, बांधिलकी स्वीकारलेला, सक्रीय, जनतेचा व जनतेशी इमान राखणारा, वर्गजागृत व क्रांतिनिष्ठ कवी म्हणून नामदेव ढसाळ याने लिहिलेली ही अपूर्व मराठी कविता म्हणूनच कालोचित, कालसमक्ष व कालदर्शी आहे.

क्रांतिगामी, प्रगत व दलित मराठी साहित्याचे दालनही आज ही नाम्याची कविता समृद्ध व सतेज करीत आहे. त्या साहित्याच्या दिशा उजळून टाकीत आहे.

—प्र० श्री० नेरूरकर

आमच्या इतिहासातील
एक अपरिहार्य पात्र :
प्रियदर्शिनी

किती अजब चमत्कार
आहे हा की—
करोडो लोक
प्रार्थना भाकताहेत
दुवा मागताहेत तुझ्यासाठी
आणि तू होऊन बसलीयस
आमच्या इतिहासातील
एक अपरिहार्य पात्र
आयुष्याच्या खडतर रस्त्यानं चालताना
तुला डावलताही येत नाही
किंवा नागमोडी वळणे घेऊन
तुझ्यापासून दूरही जाता येत नाही
आमच्या आयुष्यात तुझं एवढं

स्वाभाविक नि सुलभ असणं
इतिहासाच्या दगडावर
कोरलं जातंय काळाच्या छिन्नीनं
आणि काळ हे अस्सं एक औषध
आहे की जे वेळीच घेतलं नाही तर
त्यातलं द्विगुणित सामर्थ्य जातं संपून
प्रियदर्शिनी—
आता संपला आहे राजारजवाड्यांचा काळ
आणि त्यांच्या भाटांचाही
एक कवी : २५ पंतप्रधानांच्या इतकी
कुवत ठेवू शकतो
परंतु त्यातील पॉझिटिव्ह-निगेटिव्ह
ॲप्रोच तपासला पाहिजे
आणि या सर्वांमधून स्त्रवत रहाणारं
जनतेशी असलेलं प्रतिबद्ध नातं
आम माणसाच्या भल्याची तळी उचलणारे कवी
असतात बुद्धिबळातल्या प्याद्यांसारखे
ते सरळ शत्रूंचा मार्ग रोखतात
अंगावर घाव झेलतात
आणि इभ्रतील कॅसलिंगपासून वाचवतात
त्यांना चालता येत नाही
घोड्यासारखी अडीच घरं
किंवा उंटासारखं तिरकंसुद्धा
प्रियदर्शिनी—

गेलं वर्षभर मी काहीच लिहिलं नाही
आतमध्ये तर सारखा उसळत होता समुद्र
खदखदत होता लाव्हा
वाढत होता आजच्या आयुष्याचा अंतर्विरोध
नि मी रुजत होतो
'वांझ' म्हणविल्या जाणाऱ्या जमिनीत
गेलं वर्षभर
शब्दांचे मी पकडू शकत होतो कान
नि हवं त्या ओळीवर
चिकटवू शकत होतो
त्या गोजिरवाण्या बापड्यांना
तर हेच
अभिजात रक्ताचे बडवे
ओरडले अस्ते
'साला प्रोपोगंडिस्ट निकला' म्हणून
निपुत्रिक आकृतिबंध सांभाळून
त्यांनी शिंतोडला अस्ता माझ्या
शुभ्र सदऱ्यावर चिखल
लेबल लावून टाकलं अस्तं त्यांनी मला वाळीत
नि मढवलं अस्तं घाणीतल्या
डुकराच्या वझडीने—
गेलं वर्षभर ते पछाडले आहेत
अनामिक गंडाने
उठलं आहे त्यांचं आदिम मूळव्याध

डसलं आहे त्यांच्या शब्दांना पिसाळलेलं कुतरू
झाली आहे त्यांना स्वच्छ निर्जंतूक पाण्याची बाधा
ते सुटले आहेत सैरावैरा नि घेताहेत
चावा समीप येणाऱ्या भल्या वस्तूंचा
अनिर्बंधतेच्या भूतानं त्यांना पछाडलं आहे
नखशिखान्त, रोजच्याच
सकस स्निग्ध आहारावरली त्यांची
उडून चालली आहे वासना
भरल्या पोटावरून हात फिरवत
सोन्याच्या काडीने दात कोरीत
यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या होत्या
'भूकबळीं'वर अनेक कविता
रवंथ करीत त्यांनी गायली होती
परदुःखाची शीतल गाणी
स्वतःचं स्थिरजंगम सांभाळून
त्यांनीही ढाळले होते अश्रू
हे आणि अजून बऱ्याचशा गोष्टी
आत्ता त्यांना करता येत नाहीत उजळ माथ्याने
नि करता येत नाही सादर नाटक रंगभूमीवर
खुलेपणाने 'सर्वसामान्यांच्या जीवना'चं
त्यांचा दिनक्रम झाला आहे उद्ध्वस्त
नि बैचैनीचं गिरमीट त्यांना पोखरतं.
आहे आरपार
त्यांच्या झोपेचा झाला आहे बट्ट्याबोळ

नि ते लिहीत बसलेयत अराजकाचा सर्ग
नि त्यांनी मांडला आहे त्यांच्याच
छिनालपणाचा हैदोस
त्यांना इथेही घडवून आणायचीय
'हिरोशिमा नागासाकी'
इथल्या स्वतंत्र सार्वभौम पाण्यामध्ये
त्यांना पेरायचं आहे विष
घडवून आणायचेत दंगेधोपे
वंशवादाचं घालायचं आहे नंगं थैमान
उरकून घ्यायचंय वासनाकांड
जाळायचीत त्यांना मुक्तांगाने
सळसळणारी उभी पिकं
निळ्याभोर आभाळात पिसारत
जाणाऱ्या पाखरांचे छाटायचे
आहेत त्यांना पंख
निर्माण करायच्यायत
बाजारपेठा
आणि मांडायचा आहे
आपल्या समस्त आईचा लिलाव
करून टाकायचाय सुविद्य आरंभाचा अंत
जन्माला घालायचेत कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्स
सृजनाचा पाडायचा आहे मुडदा
नि द्यायचं आहे गिधाडांना आमंत्रण
मनुष्यप्रेतांच्या राशीवर हुंदडत

खेळायची आहे त्यांना
पक्षहीन रासक्रीडा

प्रियदर्शिनी
गेलं वर्षभर मी काहीच लिहिलं नाही
घडत जाणाऱ्या घटनांना
सामोरा होत गेलो
जनतासन्मुख गोष्टींना दाद
देत गेलो
तर ते ओरडले
'हरामखोराने तडजोड
केली' म्हणून,
तर ते ओरडले
'संधिसाधू' म्हणून
खरंच
राजकीय ठकसेनांना कसं
कळणार व्रतस्थ माणसाचं अंतःकरण
आणि त्यामधील
'बहुजन सुखाय'चा
प्रबुद्ध गजर

प्रियदर्शिनी—
ही एक छोट्या गृहयुद्धाचीच
चाचणी आहे
तू राहिली आहेस
पोलादी पावलांवर उभी
नि हुसनेच्या कुंचल्यातून
तू साकारली आहेस मिथ होऊन
तुझ्या हातात ज्ञान आहे
तुझ्या हातात बळ आहे
तुझ्या हातात हत्यार आहे
आणि तू पुकारलं आहेस युद्ध
जनतेच्या शत्रूंबरोबर
युद्ध आणि मरण
यांमधला रिदम मी ऐकतो आहे
जीवाचं रान करून
या सर्व लढाईत होतो आहे
जनतेचा विजय
नि तुझं हृदय झुकतं आहे
तिसऱ्या जगाकडे
मी फिरवतो आहे कसायांनी निर्माण केलेल्या युद्धभूमीवरून
नजर, नि त्या भूमीवरील
कष्टदायी घटनांनी, ज्वालांनी
थरकापून उठतो आहे माझा प्राण
दक्षिण आफ्रिकेतल्या हत्याकांडाने

तू निघते आहेस पिळवटून
नि घडतो आहे तुझा पिंड
कष्टकऱ्यांच्या ध्येयवादाने
मग सांग
आम्हीदेखील कसे राहू या लढाईतून दूर
हे बघ गरिबाघरच्या शब्दांना
आम्ही केलं आहे पाचारण
नि ते झाले आहेत रणांगणावर गोळा
नि घातले आहेत त्यांनी सैनिकी पोशाख
कुणाच्या हातात आहे
कामगारवर्गाचं सुदर्शनचक्र
कुणाच्या हाती आहे आदिवाशांच्या
कंदमुळाचं सत्त्व
कुणाच्या हाती आहे
गावकुसाबाहेर प्रज्वलित झालेली ठिणगी
कुणाच्या हाती आहे
शेतमजुरांच्या विळ्याचं लखलखतं पातं
शब्द म्हंजे अस्तात अस्त्रं
ते जेव्हा वर्गजागृत होऊन
उतरतात मैदानात तेव्हा त्यांचा
इन्कार करून चालत नाही

प्रियदर्शिनी—
जोन ऑफ आर्कच्या वृक्षाखाली
जेव्हा बागडत होतं तुझं
साजरं-सगुण बालपण
तेव्हा मांडलेल्या
भातुकलीच्या खेळात
बाहुल्यांनादेखील करायला लावलास
सत्याग्रह साम्राज्यशाहीच्या विरोधी
नि झोकून दिलंस
मेनस्ट्रीममध्ये तू तुझं बच्छडपण
प्रियदर्शिनी—
मी तुझं चारित्र रंगवायला इथं बसलो नाही
किंवा स्तुती गायची तुझी सुपारीही घेतली नाही
खरंच प्रियदर्शिनी—
व्यक्तींवर कविता लिहायला मला आवडत नाही
तस्संच कवितेचा विषय झालेल्या व्यक्तीलाही
कवितेपासून अस्पृश्य ठेवणं हेही मला आवडत नाही
तुझ्या राजकीय कृत्यांतून
जर होतो आहे नगरजनांचा विजय
आणि ग्राम्य माणूस जर होतो
आहे वेठबिगारीतून मुक्त
जर मिळत असेल आघाडी
कामगारवर्गाला
नि प्रतिसाद दिला जात

असेल दलितांना तर मग मी
तटस्थ कसा राहू ?
शाश्वत मूल्यांच्या गोष्टीसाठी
शब्द पणास लावणारा कवी मी
घेऊन आलो आहे स्वतःच्या
पददलित वर्गाची 'आयडेंटीटी'
वाङ्मयीन मूल्यांच्या वार्ता करणारा
मी अभिजाताच्या बिळात वावरणारा
षंढ खेकडा नाही
की जो
समुद्र खवळल्यावर मारतो दडी पुन्हा बिळात
कल्पनेच्या क्षेत्रात वावरणाऱ्या
बगळ्यांपेक्षा माझी कविता
निश्चितच आहे वेगळी
ती आम माणसाच्या सुखदुःखाचा
ऊहापोह करते
ती जनसामान्यांचे प्रश्न घेऊन उठते
घडत जाणाऱ्या परिवर्तनाला
शब्दबद्ध करते
ऑर्थोडॉक्सी आणि फॉर्मालिझमचा
ती धिक्कार करते
बहुविध होत वैश्वकतेशी नातं जोडते
'थियरी इज नॉट लिटरेचर'
अस्सं मी मानत अस्लो तरी

माझी कविता करत नाही
ब्लाइंडेड ॲक्शन
आंधळी कृती हा उगम
अस्तो फॅसिझमचा
मी माझ्या शब्दांसकट फॅसिझमच्या
विरोधी आहे.

प्रियदर्शिनी—
गझनीच्या महंमदाने
फिरदोसीला दिलं होतं
अभिवचन म्हणून त्याने
लिहिला शहानामा
ते अभिवचन पाळलं नाही त्यानं
म्हणून त्यानं लिहिला बदनामा
आणि तो झाला जगप्रसिद्ध कवी बंडखोर
तुझ्या भूमिकेच्या
बेरजेचं आणि वजाबाकीचं
गणित मांडणाऱ्यांनी मांडावं
खुशाल नि लिहाव्यात चित्रगुप्तासारख्या
खतावण्या
पण ह्या निर्णायकीमध्ये
आम्ही घेत आहोत योग्य भूमिका
जरी आवडत असला

आम्हांला हेलनच्या नृत्यातला बॅलन्स
तुला 'गुंगी गुडिया' म्हणून
अखिल स्त्रीत्वाची नित्भर्त्सना
करणारे पांगळे फकीर
आज पडले आहेत अडगळीत
आणि मळलं जात आहे
धुळीनं त्यांचं अस्तित्व
आम्ही आमच्या वर्गासोबत सदासर्वकाळ
तुझ्याबरोबर असू
दिल्लीला वेश्यागृहाची उपमा देणाऱ्या
अभिजात व्यभिचाऱ्यांचा आज
झाला आहे पाडाव
नि रक्तस्नात तलवारीच्या
टोकाला मुंडकं लटकावणारा
तैमूरलंग
कवितामग्न शायरापुढे झाला आहे
हतमस्तक
प्रियदर्शिनी—
या सर्वांचं भान ठेवण्याइतकी
तू आहेस समंजस
आमच्या हृदयाच्या नम्र कोपऱ्यात
हिरव्या पानांसारखी तू हसत रहा
नि कपटी लोकांची निर्भर्त्सना करत रहा
मग आम्ही

कोरसमध्ये
पवित्र युद्धाच्या गीताचे बोल
गुणगुणत राहू
हे महान भूमी ऊठ ऊठ
मरणांतिक संघर्षाला तय्यार हो
फॅसिस्टांशी झुंजायला
गर्द काळोखाशी झुंजायला तय्यार हो
सात्त्विक संतापाने पेटून
लाटेसारखी उसळून उभी रहा
तुझ्या युद्धाचा होम पवित्र आहे
सारी जनता ते रणकुंड धगधगत ठेवील
प्रियदर्शिनी—तू होऊन बसली आहेस
आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र
जरी वर्षभर मी लिहिली नाही कविता
तरी मी फिरवतो आहे
ह्या धुळाक्षरावरून माझी नजर
'A Day Lost in one's life
A Day Lost for ever'
'व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्'
ह्या म्हणीनंतरही इतिहास राहिलाहे घडत
'मी इथे चव्हाट्यावर
उभा आहे
लोकांना सांगतोय
पण ते माझं ऐकतच नाहीत'

अस्सं व्यासासारखं म्हणून तुला चालणार नाही
पुनरुक्ती करणारी वर्षं जात रहातात
येत रहातात
पुनरुक्ती करणारे हंगाम येत रहातात
जात रहातात
त्यामधल्या गतीला नि द्वंद्वाला
जे पारखे होतात त्यांचा व्यास होतो
व्यास म्हटला की त्याला गतीही नस्ते नि प्रगतीही
व्यासाच्या हातून कधीच होत नाही प्रभात
जी चिरत रहाते काळोखाला आरपार

प्रियदर्शिनी—
पाणी
हवा
वायू
धातू
अणू
यावर येतात प्रयोग करता
माणूस नि समाज
हवं त्याला
हवं त्या वेळी
नेता येत नाही प्रयोगशाळेत
माणसं नसतात कळसूत्री बाहुल्या

ज्यांची कळ दाबल्यावर
ती उठतात बसतात नि बंड करून उठतात
माण्सामाण्साने घडली जाते जनता
आणि जनतेचा जन्म विकास पावतो
वस्तुनिष्ठ नियमांच्या वादळामधून
मानव
निसर्ग
उत्पादन
समाज
संस्कृती
हे अस्तात वादळाचे पोत
क्रिया-प्रतिक्रिया
परस्परांचे विचार
कृती, अनुभव नि त्यांची देवघेव
यांमधून होतो वादळाच्या नव्या पिढीचा उदय
नि रात्र पाहू शकते दिवसाला
नि दिवस पाहू शकतो रात्रीला
समोरासमोर :
एकमेकांत गुंतत

सुखदायी की दुःखदायी
सुंदर की उग्रभेसूर
फुलांइतकं नाजूक की पोलादाच्या आत्म्याइतकं कठोर

न्यायी की अन्यायी
विधायक की विध्वंसक
साधक की बाधक
हे अजमावता येत नाही
स्वतःला वादळात झोकून दिल्याशिवाय
मला वादळाच्या मुखात जायला आवडतं
ढगांचा गडगंज भयव्याकुळ गडगडाट
विजांचं खेळलं जाणारं तांडवनृत्य
गारांचं संतत बरसणं
मुसळधार पावसाची दहशत
पृथ्वीच्या शुष्क उदरात घुसत जाणारा पाण्याचा लोंढा
या सर्वांमधून भिजत जायला मला आवडतं
अंतर्मनाची वल्कलं फेडून यामध्ये मला नाचायला आवडतं
पाणीच जेव्हा पाण्याशी कुस्ती करू लागतं
तेव्हा रुद्रावतारी समुद्राच्या गढूळ पृष्ठभागावर
आरूढ झालेल्या धवलफेसाच्या हिमालयीन
शिखरांवर तरंगत जायला मला आवडतं
आगीने तेजाळून टाकलेल्या काळोखातून
मला खेळायला आवडतं
या मंतरलेल्या वेळात
अंगप्रत्यंग कस्सं उसळून येत रहातं
पेशीपेशी कशा ज्वालामय होतात
श्वासांच्या घंटा कशा निनादत रहातात
रक्ताच्या लाटा कशा उकळत जातात

तृष्णेच्या वाटा कशा मिटत जातात
हे पहाता येतं आपणाला वादळाच्या
आरशात तल्लीन होऊन

प्रियदर्शिनी–
विसाव्या शतकाचा हा आहे उत्तरार्ध
एकीकडे दुनियेचा तोल ढासळतोय
दुसरीकडे दुनियेचा तोल सावरतोय
आपण सर्वच आत्ता येऊन थांबलो आहोत
एका अवघड जागी
जेथून आपणाला माघार घेता येणार नाही
हा अस्सा एक क्षण
हे अस्सं एक टोक
की ज्याला पाठ दाखवता येणार नाही
Point of No Return.
Point of No Return.
तू आणि हा कोरस
हा कोरस आणि तू
आत्ता इतिहासाच्या मागणीचा तुला करावा लागेल विचार
इतिहास सूडही घेतो
नि बक्षीसही देतो
व्यक्ती अस्ते इतिहासाचं सृजनशील साधन
‘मी—म्हणजेच इतिहास’

असा उच्चार करणारे प्रेषित
आज गाडले गेलेयत काळाच्या कबरीत
त्या प्रेषितांचे वेद
त्या प्रेषितांचं तालमुद
त्या प्रेषितांचं झेंडाव्हस्त
त्या प्रेषितांचं बायबल कुराण
त्या प्रेषितांचे कन्फ्युशियस
आपणांस देऊ शकले नाहीत पायाभूत दिशा
कालाय तस्मै नमः
त्यांनी काळच कृष्णार्पण केला
कर्मकांडात / वर्णभेदात / जातिभेदात / शोषणात
त्यांनी भविष्यालाच सडत ठेवलं
त्यांना काळोखाची पूजा बांधली
त्यांनी माणसातल्या पशुतेचं गायन केलं
जीवन म्हंजे मृत्यूचं तांडव
जीवन म्हंजे व्यस्तता त्रस्तता नि शून्यता
त्यांनी ब्रह्माच्या हाती सर्व काळसंदर्भ देऊन टाकला
येणाऱ्या दिवसांसाठी असलेली सुखसमृद्धशांती
त्यांनी नाकारली
त्यांनी तोडून टाकले वृद्धीसाठी जोडलेले पूल
जगासाठी नि सातासमुद्रासाठी
रेखाटलेल्या जिवंत स्वप्नांना त्यांनी दिले अर्धचंद्र
अन्न नि जीवनसंगीत त्यांनी टाकलं विषाळून
आकाश आणि पृथ्वी त्यांनी देऊन टाकली कसायांच्या हाती

ह्या कसायांनी माणसांची शिरं छाटून त्यांचे केले पेपरवेट
माणसांच्या नितळकातडीने त्यांनी सजवले आपले दिवाणखाने
स्त्रियांचे स्तनगोल छाटून त्यांनी बनवले टेबललॅम्प्स
मी कस्सं विसरू पृथ्वीच्या चेहऱ्यावर हिंस्र
श्वापदांनी काढलेले ओरखाडे आणि पृथ्वीच्या
गर्भाशयात ठसठसत
रहाणारी जखम

प्रियदर्शिनी
काळ आणि अवकाश
अवकाश आणि काळ
ज्यांच्या परस्पर-कार्यकारण-
संबंधांचं द्वार आज आहे तुझ्यासाठी उघडं
जीवनाचं दालन पुकारतं आहे तुला
जे हवंय जनतेला नि मला
ते आमच्या तळहातावर ठेवायला हवंयस
आमचं ईप्सित कमळफुलासारखं
उचलून खजिन्यातून
खरंच प्रियदर्शनी
भुकेने व्याकुळ झालेलो असतानाही
आम्ही आमच्या अश्रुपूर्ण डोळ्यांनी अनुभवलाय
दगडी लेण्यामधला बुद्ध
स्थापत्यानंही त्या वेळी केल्यायत

आमच्याशी गुजगोष्टी
सकाळच्या वेळेचा बुद्धाच्या चेहऱ्यावरला दिव्यप्रकाश
दुपारच्या वेळेचा बुद्धाच्या चेहऱ्यावरला दिव्यप्रकाश
संध्याकाळच्या वेळेचा बुद्धाच्या चेहऱ्यावरला दिव्यप्रकाश
रात्रीच्या वेळेचा बुद्धाच्या चेहऱ्यावरला दिव्यप्रकाश
ज्या प्रकाशात आम्ही अनुभवलीय ऊब आणि मुलायमता
भुकेच्या वेळा टाळून आम्ही केलं होतं चिंतन
ध्यानस्थ बुद्धाच्या दगडयुक्त चेहऱ्याचं
अंधाराला कापत जाणारे त्याचे डोळे
आणि दोन्ही हातांतल्या वळणामधलं अत्तदीपभव
क्रूसावर ठोकलेल्या येशूच्या वेदनांकित चेहऱ्याची
आम्ही केली होती बुद्धाच्या चेहऱ्याशी तुलना
आणि विसरलो होतो काही काळ भूक
खरंच येशू
कोकरांना क्षमा करून
आकाशीच्या बाप्पाकडे
जाताना बुद्धाचा चेहरा का घेऊन गेला नाही ?

माणूस हे नुस्तं अन्न पचवणारं आतडं नाहीहे
माणूस आपल्या सामर्थ्यानं
निसर्गावर नि स्वतःतल्या पशुतेवर करतोहे मात
माणूस काळोखाकडून प्रकाशाकडे प्रवासतोहे
माणूस स्वातंत्र्याकडे जातोहे


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२०२ २९५८० काव्य

प्रकाश आणि स्वातंत्र्य ही आहे जगाची शक्ती
आणि कविता आहे जगाचं हृदय
ती जाणिवेला सखोलता देते
ती भावनेला व्यापकता देते
ती रक्तातून उमललेल्या संवेदनाफुलांवर मोहित होते
ती पूर्वजांच्या चुकांचा कर्तृत्वाचा वैगुण्याचा
ऱ्हासाचा विजयाचा छळाचा इतिहास अधोरेखित करते
मी बसलो आहे कविता लिहायला
एका काळी मला सोडून जाणारे शब्ददेखील
आज झालेहेत सायंकालिन पाखरांसारखे गोळा
मी एका विचित्र अवस्थेत सापडलोय
मी तडफडतोय नि घामानं डबडबतोय
मी अनुभवतोय प्रसववेदनांचं दुःख
काय काय लिहू
कस्सं कस्सं लिहू
कुठल्या संज्ञेनं लिहू
भुकेबद्दल की दारिद्र्याबद्दल
दैन्याबद्दल की दास्याबद्दल
छळांबद्दल की वळांबद्दल
संस्कृती
रीतिरिवाज
पायरी
देव धर्म दगड
ह्यांच्या नावावर त्यांनी आम्हांला मारलंय

ठेचलंय मारलंय
त्यांनी तोडलेयत लचके आमच्या हाडामांसाचे
होत्याची नव्हती अशी करून ठेवलीयत त्यांनी
आमची थोबाडं
जिवंतपणी त्यांनी जाळलंय आमच्या माण्सांना
त्यांनी सडवून टाकलेयत गिरिकंद्रात आमचे पवित्र देह
त्यांनी लुटलंय आम्हांला सदासर्वकाळ
त्यांनी घडवून आणल्यायत आमच्या कच्च्याबच्च्यांच्या कत्तली
आमचं ताजं स्वच्छ उष्ण उग्र रक्त
जे ओघळत गेलं मातीच्या उदरात
परंतु त्या मातीने दिली नाही आम्हांला ऊब
तिनंच घोटले आमचे गळे
आम्हांला वाटलं होतं ती आम्हांला रुजवेल
आम्हांला वाटलं होतं ती आम्हांला वाढवेल
आम्हांला वाटलं होतं ती आम्हांला बळ देईल
आम्हांला वाटलं होतं ती आम्हांला शक्ती देईल
त्या काळ्या मातीनं काळोख्या साम्राज्याचा आधार
घेऊन सनातन्यांच्या इच्छेसाठी आम्हांला हद्दपार केलं
हद्दपार केलं ग्रंथांतून
हद्दपार केलं देवळांतून
हद्दपार केलं वेशीआतून
हद्दपार केलं जित्याजगत्या माणसांतून
नि देऊन टाकली सनद फुटकी मडकी गाडगी
संभाळण्याची

प्रेतावरली कफनं पांघरण्याची
प्रेतावर उधळलेली खैरात हे होतं आमचं धन
आमच्या पंगती लागत कुतऱ्यामांजरांसोबत
उष्ट्यावाष्ट्यासाठी
गिधाडांसारखी मेलेल्या जनावरांची त्यांनी करायला
लावली आम्हांला लयलूट
कुतरी : गिधाडं : मांजरं आणि आम्ही माणसं
आम्ही जगलो पशूंच्या संगतीनं
काय आणि कस्सं लिहू
ज्या जंगलामध्ये रक्ताचं पाणी करून
आम्ही लावली होती झाडंझुडपं
तीच त्यांनी टाकली तोडून
वाटलं होतं आम्हांला
एक ना एक दिवशी आम्ही बसू त्या झाडांच्या
गर्दमायाळू सावलीत
झाडांची पानं पानं जातील फैलावत
त्यांआडून, पूर्वदिशेकडून फाकेल लालजर्द दिशा
आणि आमच्या हृदयाच्या अंधारगुहा होऊन जातील
प्रकाशमय
ताणली जाईल आमची छाती हिंमतीनं
ध्वजासारखी मिरवली जाईल मान
नि उभे राहू आम्ही आमच्या पायावर
आकाशाला ठेंगणं बनवत
आणि कोरू आमच्या हातावर

आमचं भविष्य जे उज्ज्वलतेच्या कुंकवानं
माळलं जाईल सतीचं वाण घेऊन

युगेन युगे समाप्त होत गेलेल्या पक्षांमध्ये
भरली जाईल संजीवनी
नि कल्लोळीत केली जाईल आमच्यासाठी प्रभात
परमेश्वरानं आजपर्यंत दिला होता आम्हांला भरोसा
यापूर्वी तो गाजवायचा अधिसत्ता आमच्यावर
करायचा तो वायदा आम्हा मुक्याबापड्यांशी
निर्णयाच्या वेळी मात्र तो आपलं काळं करायचा
जेव्हा त्याची अपारशक्ती आम्हांला उद्‌ध्वस्त
करत जायची तेव्हा आम्ही करायचो त्याचा धावा
भडवा विटेवरून खाली उतरून कधीच आला
नाही आम्हापर्यंत दुडूदुडू चालत
कधीच धरली नाही त्यानं आम्हांवर छाया कृपेची
त्याची कृपा होती वांझ नि व्यभिचारी
तो आम्हांला खेळवत राहयचा उंदरासारखा
अव्वाच्या सव्वा दंतकथा सांगून तो भेडसावायचा
आम्हांला
चंद्रसूर्य मिटतील
आभाळ फाटेल
वेळेचं आमंत्रण होईल तेव्हा मी प्रत्येक
पाप्याचा हिशेब घेईन

खरंच आतापर्यंत आम्हांला छळणाऱ्या
दुष्ट शक्तींचा त्याने कधीच समाचार घेतला नाही
की न्यायाच्या आसुडाने त्याने दुष्टांची चामडी
लोळविली नाही
आमच्या आयुष्यावर केली होती वेदनेने सही
जेव्हा आमचं बाळपण हातात खुळखुळ्याची काठी
घेऊन नि माथ्यावर टोपलं घेऊन
रानावनांतून ढेकळाढुकळांतून
पांदीपादीनं रूळल्या वाटेनं
भाकरीच्या तुकड्यासाठी करायचं वणवण
हाळी द्यायचं
'जोहार येस्कराला भाकर येवूंद्या मायबाप'
तेव्हा रयतेतल्या धन्यांनी केलेली आमची
विटंबना, दिलेल्या शिव्यांचा इतिहास
की आईमाईचा झालेला उद्धार ह्याचा
उच्चार करू? की
पाणी पाणी करत टाहो फोडत मेलेल्या पिढ्यांच्या
तृष्णेबद्दल लिहू? की
दुज्या पाणवठ्याची दुःखकहाणी सांगू की
भाजीच्या देठापायी नागवल्या गेलेल्या आयाबहिणींचे
आक्रोश शब्दबद्ध करू? की
रयतेचं जू वाहून वाहून बापजाद्यांच्या खांद्याला
जडलेलं गळू टिपून घेऊ
ज्या संस्कृतीत काळी कातडी असणं हा होतो गुन्हा

ज्या संस्कृतीत काळीकातडी असणं हे होतं विलक्षण पाप
ज्या संस्कृतीत अस्पृश्य असणं हा होतो गुन्हा
ज्या संस्कृतीत अस्पृश्य असणं हे होतं विलक्षण पाप
त्याबद्दल किती लिहू
हार्लेम आणि घेटोबद्दल
महारवाडा नि मांगवाड्याबद्दल
वरळीला पेटलेल्या ठिणगीचा ज्यांनी
खून पाडला
ज्यांनी शहीद भागवत जाधवच्या
कधी न झुकणाऱ्या शिरावर धोंडा घातला
ज्यांनी नारनवरेला दगडांसाठी कापला
ज्यांनी गवई बंधूंची तेजस्वी बुबळं फोडली
किलावेनमानी नि हाथीगड
जोहान्सबर्ग नि कॅलिफोर्निया
ज्यांनी निग्रोंच्या लाल रक्ताने आपले गोरे पापी
पंजे रंगवले
ज्यांनी मालकम एक्स, जोनाथन, जॉर्ज जॅक्सनला
गोळ्यांची शिकार बनवलं
ज्यांनी सोलेदादच्या भिंतीत क्रांतीचं गाणं
चिरडलं त्यांच्याबद्दल किती लिहू
रक्तात पेटत सुटलेली आग आता विझता
विझत नाही दिवसेन दिवस ती धगधगतेय
तृणाच्या पात्यांमधून
दगडधोंड्यांतून

हवेतून, पाण्यातून
पेट घेतायत
अग्निज्वाला सहस्र सहस्र जिव्हा
पसरतायत दैत्यांना राख करण्यासाठी
तडफड
उरस्फोड
आक्रांत
जखमा
घाव रक्त पू
आक्रोश किंकाळ्या
हँगिंग
रक्ताचे वाहणारे पाट
आम्ही धिक्कार करतोत अपार्थिंड तत्त्वज्ञानाचा
आम्ही टाचांखाली चेचून काढतो
संघतत्त्वज्ञानाला
आम्ही गातो लढतो बळी जातो
छळातून उद्भवली आहे प्रतिभा
तस्करांची अंत्ययात्रा निघायला आता वेळ लागणार नाही

प्रियदर्शिनी – द्रष्ट्या गुलाबानं मारलेली आर्त हाक
ज्या संस्कृतीनं केला गुलाबाचा छळ
आणि खुडले त्याला ऐन वचनपूर्ततेच्या वेळी
प्रियदर्शिनी – त्या द्रष्ट्या गुलाबाशी तू प्रतारणा करू नकोस

त्यानेच तुला क्रांत्यांचा इतिहास शिकवला
त्यानेच तुला युग-उद्‌घोषाचा धडा दिला
प्रियदर्शिनी – तू आहेस
आमच्या इतिहासातील एक फेज
प्रेषिताच्या भौतिक भूमिकेपासून
आत्ता होऊ शकत नाही तुझी सुटका
पुराणात सांगितलेल्या तिन्ही युगांचा
झालाहे अंत
आज ज्या युगात आपण जगतो
त्याला संबोधतात मुक्तिपर्व
ह्या पर्वाच्या दीप्तीने सर्व पृथ्वी निघतेहे उजळून
अत्याचाऱ्यांचा नि पाप्यांचा होतो आहे नायनाट
सुल्तानी सैतानांची बांधली जातायत थडगी
आत्ता तू करायला हवायस
भूतवर्तमानभविष्य ह्या त्रिकालाचा
स्थूल नि सूक्ष्म विचार
ज्ञानाचा उद्भव ज्या श्रमांतून होतो
त्या श्रमसाफल्याच्या उद्दिष्टांना तू द्यायला
हवंयस निमंत्रण
निर्भेळ स्वच्छ अंतःकरणानं
जायला हवंयस स्वच्छ नजरेनं सामोरं
नि द्यायला हवंयस माणसाच्या स्वातंत्र्याला
गाढ आलिंगन
निर्णयाची घडी आली आहे जवळ

सर्वंकष स्वातंत्र्याची वेळ आली आहे जवळ
स्वइच्छेने आम्ही मरणाच्या मुखात
जायला झालो आहोत तैयार
जर होणार असेल जग सर्वार्थाने मुक्त
तर आम्ही कच्च्याबच्च्यांसकट
रक्त सांडायला आहोत तैयार
मारले जातील असंख्य लोक
प्रेतांच्या उभारल्या जातील राशी
तर आम्हांला नाही तमा कशाचीही
यापूर्वी आमच्या अगणित पिढ्या झाल्यायत
बरबाद
परंतु आमचं बहुवांछी स्वातंत्र्य येऊ शकलं नाही
आम्हापर्यंत
आज आम्ही
त्या बहुवांछी स्वातंत्र्याला खेचून
आणायला निघालो आहोत
ते येईल येईल आमच्या जीवनात
ते संचारेल आमच्या प्राणात
ते पसरलं जाईल आमच्या रक्तात
झंझावातासारखं
त्याच्यासाठी आम्ही रक्त सांडायला निघालोत
त्याच्यासाठी आम्ही गिलोटिनखाली
मान ठेवायला निघालोत
त्याच्यासाठी गॅसचेंबरमध्ये

गुदमरून मरायला निघालोत
ते स्वातंत्र्य आमची करू
शकणार नाही प्रतारणा
ते टाळू शकणार नाही आम्हांला
ते आसुसलंय आम्हाला आलिंगन देण्यासाठी
ते आसुसलंय आम्हांला अन्नपाणी मुबलक देण्यासाठी
ते आसुसलंय आम्हांला वस्त्र-निवारा
विपुल पुरविण्यासाठी
ते आसुसलंय आमच्या हाती जनसत्ता सोपविण्यासाठी
ते आसुसलंय आमच्या कष्टाळू हाताचे मुके घेण्यासाठी
ते आसुसलंय आमच्या शिरावर मुकुट
चढविण्यासाठी

प्रियदर्शिनी—
आम्हांला कळू शकतात पत्थरातली अंतर्‌स्पंदनं
आपल्या सुंदर काळयाभोर मंजुळ गळयातून
जाझच्या लयीत प्राणांतिक होऊन
पॉल रॉबसननं छेडलेलं मुक्तीचं गीत
त्या गीतानं शहारलेलं तुझं अंगअंग पाहिलंय इतिहासानं
मानवतेचा नि लोकशाहीचा ठेका
घेणाऱ्यांनीच जेव्हा केली होती
त्याची मुस्कटदाबी
त्याला बोलायला

नि गायला
नि तिसऱ्या जगात
फिरायला केली होती बंदी
तेव्हा तुझ्या रक्तात पसरलेली संतापाची लाट
इतिहासानं न्याहाळली आहे.

लष्करशहांनी मानवतेच्या शत्रूंनी
जेव्हा हाणला सोनारबांगलाच्या
हृदयात हिंसेचा चाकू
त्या वेळी मुजीबला आणण्यासाठी धाडलेलं मानवतावादी प्लेन
जेव्हा रिकामंच परतलं मायदेशात
त्या दिवसाचं तुझं आक्रंदन इतिहासानं अनुभवलं आहे
ज्या दिवशी निक्सननं दिलेल्या मेजवानीचा धिक्कार
करून तू काढलीयस साम्राज्यवादी देशाच्या
विमानतळावर रात्र जागून त्या दिवसाचा
करारीपणा इतिहासानं नोंदला आहे

अंकल होच्या कवितांनी भारावून जाणारी तू
पाब्लोच्या मरणानं भडकून उठणारी तू
नव्या जगाच्या पितृभूमीला अभिवादन करणारी तू
आफ्रो-आशियाच्या नि तिसऱ्या जगाच्या भल्यासाठी
समझोता एक्सप्रेस सुरू करणारी तू
घावांच्या जखमा भरल्यानंतर
नव्या चीनशी संबंध जोडायला निघालेली तू
तू होऊ पहातेयस एक आव्हान
हुकूमशहा नि स्वामींना

जे दिवसा होळी खेळतात
नि रात्री दिवाळी
जे गोऱ्या चामडीशी चाळे करतात
नि मद्याच्या प्याल्यासकट
आमचं रक्त पीत रहातात
त्या राष्ट्रीय नि आंतराष्ट्रीय कसायांना
तू झाली आहेस आव्हान
नि मी गेलो आहे भारावून
तू आहेस
जनतेच्या क्षोभाचा नि क्रोधाचा आविष्कार
पुराणकथेतल्या ' चंडिके 'ची
तुला द्यावीशी वाटतेय उपमा
जी देवता होती अनार्यांची
कवी म्हणाला होता,
थैय थैय नाचत
येई भैरवी थैय थैय नाचत ये
आणि कवीनं ओळखलं होतं रुद्राला
' पाड सिंहासने दुष्ट ही पालथी
ओढ हत्तीवरूनी मत्त नृप खालती
मुकुट रंकास दे करटी भूपांप्रती
झाड खट्खट् तुझे खड्ग क्षुद्रां '
प्रियदर्शिनी—
रंकांचा छळ न होऊ देण्याचं
तू निभवायला हवंयस अभिवचन

कामगार
शेतकरी
विद्यार्थी
दलित
जनता
ह्यांच्या गौरवासाठी तू झगडायला हवंयस अहोरात्र
तुझ्याभोवती दबा धरून बसलेले क्रोनसचे
वारसदार पाहतायत संधी तुझा डाव उधळून
देण्याची, स्वतःच्याच आपत्याचे गळे घोटणारे क्रोनस
त्यांचे फाडायला हवेस तू बुरखे
क्रोनसची पाठराखण करणारी साम्राज्यशाही
दृश्य स्वरूपात जरी नष्ट झालेली दिसली तरी ती हडळीसारखी
अदृश्य रूपाने अस्ते लपून

तिने पेटविलेली महायुद्धं
आणि त्यानंतरचे
विनाश, उपासमार, दुष्काळ
नि साथींच्या रोगांचा फैलाव
तू पाहिलयस नाझी भस्मासुरांचा अंत
तू पाहिलंयस झारचं फाडलं गेलेलं पोट
प्रियदर्शिनी—
तू स्वातंत्र्याला अभय दे
तू मुक्तीला अभय दे

REFBK-0021740
REFBK-0021740

तू नव्या जगाचा झेंडा लहरत ठेव
तू पाहिलायस वॉरफिल्डवर
केला गेलेला स्त्रियांचा लिलाव
बोस्टन
नि पॅसिफिक महासागरात बुडवल्या जाणाऱ्या
धान्याचा तू घेतलायस समजून अर्थ
मनुष्यनिर्मित दुष्काळामागील आसुरी लालसा

वेदांनी स्त्रीला
पाचवा वर्ण उल्लेखून
थट्टा केली आहे संस्कृतीची
भांडवलदारांनी स्त्रीला
सेक्सडॉल संबोधून
विडंबना केली आहे अतिपवित्र मानवजातीची
सध्या देशात दुष्मनांची चालू आहेत बौद्धिकं
तू म्हंजे दुसरी रझियाच
रझियाची उपमा देऊन ते करू पाहतायत
स्त्रीत्वाची निर्भर्त्सना
फार बरं झालं त्यांनी तुला दुसरी रझिया म्हटलं
त्याच दिल्लीत रझियानं पहिलं बंड उभारलं
आणि आत्ता तू
काळ्या कारवाया करणारे हबशी नष्ट होऊन गेलेयत
काळाच्या तडाख्याने

मागे रझिया अमरच राहिली
प्रियदर्शिनी—तू जागृत रहा
रात्र वैऱ्याची आहे
जर सैल सोडलास लगाम
नि वाकडं पडलं चुकून तुझं पाऊल
तर माणसांचे दुष्मन येतील सत्तेवर
आणि तुझ्या अगोदर ते
फासावर चढवतील जनतेच्या
कवींना—
त्या दिवशी इतिहास तुला क्षमा करणार नाही
त्या दुर्दैवी दिवसाला तू देऊ नकोस
संधी
कदाचित तोपर्यंत पूर्वदिशा
रंगून गेली असेल लालजर्द रक्ताने
आणि जीवनाचं साधन आलं असेल
आपल्या सर्वांच्या संपूर्ण सुफल हातात
मिरविण्यासाठी दाही दिशांतून
माणसाच्या भल्याची दुंदुभी

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३००
२१८४०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
काव्य